कारली जातील.
सी., टीटीसी
पाठी, महापे
ई -७०५.
७७८८६

जनतेचा
# महानायक
www.emahanayak.com
मुंबई व नागपूर येथून एकाच वेळी प्रकाशित | मुंबई | शुक्रवार, दि. २४ एप्रिल, २००९ | पृष्ठे - ८

# राज्यात ५५ टक्के

मुंबई/प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीच्या राज्यातील दुसऱ्या टप्प्यातील २५ मतदार संघातील मतदान आज किरकोळ अपवाद वगळता शांततेत पार पडले. या टप्प्यात एकूण ५५ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सकाळी मतदान सुरु होताच मतदान केंद्रावर मतदारांनी रांगा लावल्या होत्या. १० वाजेपर्यंत मोठ्या संख्येने मतदान झाले मात्र त्यानंतर उन्हाचा त्रास वाढल्यामुळे मतदानाचा जोर ओसरला. संध्याकाळी ३ नंतर मतदानात पुन्हा वाढ झाली. राज्यात आतापर्यंत पार पडलेल्या दोन्ही टप्प्यात मतदारांनी मतदान करण्यात फारसा उत्साह दाखविलेला नाही.**

राज्यातील मराठ्यांचे दिग्गज नेते शरद पवार निवडणुक लढवित असलेल्या माढा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात बोगस मतदान झाल्याच्या तक्रारी निवडणूक निर्णय अधिकाराकडे करण्यात आल्या आहे. त्याचप्रमाणे नाशिक मतदार संघातील २० मतदान केंद्रावर बोगस मतदान झाल्याने या केंद्रावर पुन्हा मतदान घेण्याची मागणी शिवसेनेने केली आहे. नाशिकमधील बी.डी.भालेकर हायस्कुल मतदान केंद्रावर शिवसेना व राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यात हाणामारी झाली. बीड लोकसभा मतदारसंघातील अंबेजोगाई येथील वेणुताई विद्यालय मतदान केंद्रावर मोठ्या प्रमाणावर मतदान झाले. अनेक मतदार संघात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना या पक्षांकडून निवडणूक मार्गदर्शक तत्वांना धाब्यावर बसवून मतदारांची बेकायदेशीररित्या वाहतूक केली. राज्यातील विविध मतदार संघात घडलेल्या गैरप्रकाराची माहीती राष्ट्रीय दलित इलेक्शन वॉच या संघटनेने गोळा केली असुन त्याबाबत संबधीत जिल्हाधिकारी, जिल्हा निवडणुक अधिकारी, तसेच निवडणुक आयोगाकडे पाठपुरावा करण्यात येईल असे संघटनेच्या वतीने भारत काळे, केवल उके, प्रविण मोरे, सिद्धार्थ खरात यांनी कळविले आहे.

## दलितांना धमक्या

- बीड लोकसभा मतदार संघातील शेपवाडी मतदान केंद्रावर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते बाळासाहेब शेप आणि रामभाऊ शेप यांनी दलितांना दमबाजी करुन घड्याळास मतदान न केल्यास शासकीय योजनापासून वंचित ठेवण्यात येईल अशी धमकी दिली.
- माढा लोकसभा मतदार संघातील सांगोला तालुक्यातील डोंगरगाव तसेच कुरवारी येथे मतदारांना दारुचे बॉक्स वाटप करण्यात आले. या ठिकाणी डवरी वस्तीवरील काही मतदारांना मतदान करु दिले नाहीत.
- माढा लोकसभा मतदार संघातील माणं तालुक्यामध्ये राष्ट्रवादीचे आमदार शशिकांत शिंदे व सदाशिव पोळ यांनी दलित वस्त्यांमध्ये पैसा वाटले.
- लातूर लोकसभा मतदार संघातील अहमदपूर येथील भाग्यनगर वार्ड क्रमांक २ चे भाजप नगरसेवक पठाण यांनी अल्पसंख्याक व दलितांना एकत्र बोलावून भाजपाला मत न दिल्यास वार्डात पाणी सोडणार नाही, अशी धमकी दिली. याच लोकसभा मतदार संघातील मुरुड-बोरगाव (काळे) येथे राजीव गांधी निराधार योजनेचे पैशे वाटप करण्यात आले.
- उस्मानाबाद लोकसभा मतदार संघातील बार्शी तालुक्यातील दहीवळ गावात राष्ट्रवादीच्या आमदाराने दलित वस्तीमध्ये प्रत्येक मतदाराला एक हजार रुपये देऊन राष्ट्रवादीला मतदान करण्यास धमकाविले.